विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०
सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर
CNR-MHJNO20000171990

## निशाणी क्र.२१० वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जात वादींनी कथन केले आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणात पारीत झालेल्या जैसे थे आदेश तसेच निशाणी क्र.५० वरील तात्पुरता मनाई हुकम आदेशाचा भंग प्रतिवादींनी केल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ नुसार निशाणी क्र.७६ दिनांक ११.०३.१९९६ रोजी, निशाणी क्र.८३ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २(अ) नुसार दिनांक ०३.०८.१९९६ रोजी निशाणी क्र.८६ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ नुसार दिनांक ०३.०८.१९९६ रोजी, निशाणी क्र.१०५ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ नुसार दिनांक ०८.०१.१९९८ रोजी, निशाणी क्र.१३४ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ नुसार दिनांक २८.०६.१९९९ आणि निशाणी क्र.१३६ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २ दिनांक २८.०६.१९९९ रोजी दाखल केले असून ते बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. तरी सदर अर्जावरील सुनावणी पहिले घेवून निकाली काढण्याबाबत प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला.

२) सदर अर्जावर प्रतिवादींतर्फे निशाणी क्र.२१२ वर म्हणणे देण्यात आले की, प्रस्तुतच्या प्रकरणात वादींनी साक्षीपुरावा न दिल्याने दिनांक ०९.०२.२००० रोजी वादींचा दावा खारीज करण्यात आला होता व सदरहु आदेश रु.५०००/– खर्च बसवून रद्द करण्यात आला व वादींचा दावा पुन्हा पुर्नजीवीत करण्यात आला असे असताना वादींनी प्रकरण प्रलबिंत ठेवण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. वादींनी नमुद केलेले सदरहू अर्ज मुळ दाव्यासोबत चालविण्याबाबत आदेशीत झालेले आहे. त्यामुळे वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विंनती केली आहे.

३) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली असता, वादींनी करारपुर्तीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला असून निशाणी क्र.२७ आणि ३९ वरील जैसे थे आदेश

व निशाणी क्र.५० वरील तात्पुरता मनाई हुकूमाच्या आदेशाचा प्रतिवादींनी कथितरीत्या भंग केल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ अन्वये निशाणी क्र.७६, ८६, १०५ व १३४ वर आणि दिवाणी प्रक्रिया सहिंता आदेश ३९ नियम २ (अ) अन्वये निशाणी क्र.८३ व १३६ वर उपरोक्त नमुद तारखेला अर्ज दाखल केलेले आहेत. सदरहु अर्जाचे अवलोकन केले असता, निशाणी क्र.१३४ व निशाणी क्र.१३६ या वर दिनांक १९.०७.१९९९ रोजी सदरहु अर्ज मुळ दाव्यासोबत चालविण्यात येवून प्रकरण साक्षीपुराव्यासाठी ठेवण्यात आल्याचा आदेश तत्कालीन दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांनी पारित केल्याचे आढळते. सदरहु आदेशाला वादींतर्फे आव्हानीत करण्यात आले नसतानाही सदरहु अर्जावर प्रथम सुनावणी घेण्याच्या विनंती करणारा प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०९.०९.२००४ रोजी दाखल करण्यात आला असून तेव्हापासून प्रकरण वेगवेगळया बाबींवर प्रकरण प्रलंबित आहे.

४) अभिलेखाची पडताळणी केली असता, दिनांक ०९.०९.२००० रोजी वादींतर्फे साक्षीपुरावा देण्यात कसूर झाल्याने दावा खारीज करण्यता आला होता. किरकोळ अर्ज क्र. २२/२००० वरील दिनांक २२.११.२००२ रोजीच्या आदेशान्वये सदर आदेश खर्चासह रद्द करण्यात आला व दिनांक २८.०१.२००३ पासून प्रकरण साक्षीपुराव्यासाठी प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.२१० दिनांक ०९.०९.२००४ रोजी देण्यात आला. सदरहु अर्ज देते वेळेस पुर्वीच्या अर्जावर दावा साक्षीपुराव्यासाठी ठेवण्यात येत आहे असा पारीत केलेला आदेश रद्द करुन उपरोक्त नमुद अर्ज प्रथम निकाली काढावे अशा आशयाची विनंती सुध्दा प्रस्तुत अर्जात केलेली नाही. यावरुनच वादींनी प्रकरणात झालेले आदेश पाहण्याची तसदी न घेता पुन्हा पुन्हा त्याच आशयाची विनंती वादींतर्फे करण्यात येत असल्याचे दिसून येते.

५) प्रस्तुतच्या प्रकरणात निशाणी क्र.२११ वरील आदेशाविरुध्द प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.२४१२/२००५ द्वारे आव्हानित केले. मा. उच्च न्यायालय यांनी

दिनांक २०.०२.२०२० च्या आदेशान्वे तत्कालीन दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना यांनी निशाणी क्र.२११ वर पारीत केलेला आदेश रद्द करण्यात आला. त्याचप्रमाणे सदर रिट पिटीशनमधील आदेश पारीत करताना मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या प्रकरणात कालमर्यादा ठरवून दिली आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे ३० वर्षापेक्षा जास्त जुने प्रकरण असून त्यामधील मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाची वादींला कल्पना असतानाही वादींने पुन्हा सदर अर्ज निशाणी क्र.२१० हा निकाली काढण्याबाबत पुन्हा विनंती केली. यासर्व परिस्थतीवरुन प्रकरण अतिशय जुने व कालबध्द प्रकरण असूनही वादींतर्फे पुन्हा पुन्हा त्याच आशयाची विनंती करण्यात येत आहे ही खेदाची बाब आहे. उपरोक्त चर्चेवरुन प्रस्तुतचा अर्ज हा तथ्यहीन असल्याने खर्चासह फेटाळण्याजोगा आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यता येतो.

**आदेश**

१) अर्ज रु.५००/– खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

२) वादींनी खर्च रु.५००/– आज रोजी किंवा पुढील तारखेच्या आत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथे जमा करावी.

Digitally signed by Madhuri Sudhakar Kulkarni
Date: 2021.02.11 17:05:46 +0530

(**एम. एस. कुलकर्णी**)

दिनांक ११.०२.२०२१

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व. स्तर), जालना

दिनांक : ११.०२.२०२१

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (नि. श्रे.)